!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प २००/१२/०३/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# पावसाळ्यापुर्वी उड्डाणपुलांचे कामे करा : खासदार चंद्रकांत खैरे

## एम. एस.आर.डि.सी. व सा. बां. अधिकाऱ्यांसह उड्डाणपुलाची केली पाहणी

**संभाजीनगर : (ता.२३)** शहराच्या मध्यवर्ती व जास्त वाहतुकीचा वापर असलेल्या ठिकाणी उड्डाणपुलांची कामे सुरु आहे. यामुळे दिवसभर सर्व सामान्यासह वाहन धारकांची वाहतुक समस्या वाढत आहे. या करिता पावसाळ्यापुर्वी उड्डाणपुलांची कामे करुन शहरवासियांचा वाहतुकीचा प्रश्न सोडविण्याची सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी एम. एस. आर. डि. सी. व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना दिल्या. तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. एकनाथ शिंदे व सचिव यांच्याशी दुरध्वनीवरुन संबंधित कामांना जास्तीतजास्त निधी देऊन सर्वसुविधा पुरविण्याची मागणी करत शहरवासीयांना लवकर सेवा देण्याची मागणी केली.

या पाहणी दरम्यान महापौर कला ओझा, शहर अभियंता एस. बी. पानझडे, एम. एस. आर. डि.सीचे अभियंता देशमुख डि.पी. कुलकर्णी, नगरसेविका साधना सुरडकर, आनंद तांदुळवाडीकर, सुधीर भाले, शिवाजी बनकर यांच्यासह संबंधित विभागचे सर्व अधिकारी वर्गाची पाहणी दरम्यान उपस्थिती होती.

उड्डाणपुलाच्या आजुबाजुच्या वीजेच्या खांबा संबंधित व तारा याबाबत ही महापालिका अधिकारी व बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्यात समन्वय करुन त्वरीत हटविण्यासाठी प्रस्ताव करण्याची सुचना दिली. सर्व आवश्यक सुविधा उड्डाणपुलाना व फुटपाथ, साईड रोड या बाबत नागरिकांच्या सुचना लक्षात घ्या लवकरातलवकर सेवा देण्याची सुचना केली.

प्रसिध्दी प्रमुख

फोटो मेल केला आहे.

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400